दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.०९ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## अमोल कोल्हेंना राजीनामा देण्यापासून मी थांबवले:त्यांनी मतदारसंघाचे कुठलेही विकासाचे प्रश्न मार्गी लावले नाही

### ते शिरुरमध्ये फिरकलेच नाही–अजित पवार



**पुणे (वृत्तसंस्था)–अमोल कोल्हे २०१९ नंतर काही दिवसातच मला येऊन भेटले आणि मला माझ्या अभिनय क्षेत्राला वेळ देता येत नाही म्हणाले. मी समजावून सांगितले आणि राजीनामा देण्यापासून थांबवले. या व्यक्तीने कुठलेही विकासाचे प्रश्न मार्गी लावले नाही. मतदारसंघात फिरकले नाहीत, असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे.**

दरम्यान अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, २०१९ ची निवडणूक लागली अनेकांचा आम्ही शिरुर लोकसभेसाठी विचार करत होतो पण कोणीच तयार होईना. मग आम्ही मागील वेळी धनंजय मुंडे यांच्या घरी बसलो असताना आम्ही आमोल कोल्हे यांना फोन करुन बोलावून घेतले. आम्ही त्यांना म्हटले तुम्ही शिरुर लोकसभेतून निवडणूक लढवा. ते म्हणाले मी शिवसेनेत आहे. लोकसभेचा मला काहीच अनुभव नाही, परंतू मी त्यांना सगळे आम्ही पाहतो म्हटलो, आणि आम्ही त्यांना उभे केले. महिला आणि तरुण वर्गांने त्यांना छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका केल्यामुळे डोक्यावर घेतले. याच कारणास्तव ते निवडून आले, असेही अजित पवारांनी म्हटले आहे.

अजित पवार म्हणाले की, मी कामाचा माणूस आहे. एक घाव दोन तुकडे करणारा व्यक्ती आहे. सत्तेतून प्रश्न मार्गी लागतात म्हणून आम्ही सरकारमध्ये गेलो आहोत. उरळी कांचन करांनो समोरच्या व्यक्तींला खासदार की मध्ये काहिच रस नाही. त्यामुळे आपल्यासाठी कामाची असणारी व्यक्ती म्हणजे आढळराव पाटील आहेत, त्यांना विजयी करा. थेऊर कारखाना सुरु करणे, उपबाजार, ट्रँफिक असे सर्व प्रश्न आपण मार्गी लावू, असेही अजितदादांनी म्हटले आहे.अजित पवार म्हणाले की, मला ३३ वर्षे झाली ९१ साली मला खासदार म्हणून निवडून दिले होते. तसा आपला जुना संबंध आहे. ही निवडणूक देशाची सूत्र कोणाच्या हातात द्यायची. देश कोण योग्य दिशेने घेऊन जाईल याबाबतची आहे. कोणाच्या विचाराचा खासदार दिल्लीमध्ये निवडून पाठवायचा आहे याबाबतची ही निवडणूक आहे. मागील काळातील २००४, २००९ आणि २०१४ अशा निवडणुकांमध्ये आम्ही अनेकदा आढळराव पाटील यांना पराभूत करण्याचा प्रयत्न केला परंतू आढळराव पाटील यांचा शेवटच्या मतदारासोबत असलेला कनेक्ट, सामाजिक काम, डाऊन टू अर्थ राहण्याची त्यांची पद्धत यामुळे आम्हाला शक्य होत नव्हते.

## जिल्ह्याचे नामकरण, शेतकऱ्यांना पाणी आणि दिवसा वीज–देवेंद्र फडणवीस



**अहमदनगर–**२०१४ आणि २०१९ मध्ये देखील याच मैदानावर नरेंद्र मोदी यांच्या सभा झाल्या होत्या. मात्र, आजच्या नरेंद्र मोदी यांच्या सभेने सर्व रेकॉर्ड मोडला असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार सदाशिवराव लोखंडे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मोदींसमोरच देवेंद्र फडणवीस यांनी अहमदनगर जिल्ह्यातील मतदारांना अनेक आश्वसने दिले.

निलवंडे कालव्याचे काम पूर्ण करण्याचे काम नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वात झाले असल्याचा दावा देखील त्यांनी केला. बाळासाहेब विखे पाटील यांनी पाहिलेले स्वप्न नरेंद्र मोदी यांच्यामुळेच पूर्ण झाले असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यामध्ये चार एमआयडीसी तयार झाल्या असून या सर्व एमआयडीसीमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग उभे राहतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्याला औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख मिळेल, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.आगामी काळात येथे दिवसाला बारा तास वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादानेच शिर्डी मध्ये नवीन विमानतळ तयार होत आहे. या माध्यमातून अहमदनगर आणि शिर्डीचा चेहरा बदलण्याचे काम नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नाने होत असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. त्यासाठी अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून सुजय विखे पाटील तर शिर्डी लोकसभा मतदारसंघातून सदाशिव लोखंडे यांनी विजयी करण्याचे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## आरोप करणाऱ्यांच्या डोक्यावर परिणाम झालाय बगलबच्च्यांच्या बोलण्याला महत्व देत नाही–पवार

**बारामती–**आरोप करणाऱ्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. बगलबच्च्यांच्या बोलण्याला महत्व देत नाही असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यावर पलटवार केला आहे. बारामती मतदारसंघात विरोधकांकडून पैसे वाटले जात असल्याचा आरोप करत रोहित पवार यांनी काही व्हिडिओ शेअर केले होते. त्यांच्या या आरोपांना अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आज अजित पवार यांनी सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यानंतर काटेवाडीत माध्यमांशी ते बोलत होते.

यावेळी रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांबाबत विचारले असता अजित पवार म्हणाले, ''सध्या ते आमच्यावर आरोप करत आहे. मी देखील त्यांनी अतिशय चुकीच्या पद्धतीने निवडणुकीची हाताळणी केला असा आरोप करू शकतो. परंतु मी तसे करणार नाही. ते काहीपण आरोप करत सुटले आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँक उघडी असल्याचे कोणी पाहिले का? तो व्हिडीओ कालचा होता का? याची कोणी शाहनिशा केली का? आरोप करणाऱ्या व्यक्तीवर परिणाम झाला असून तो काही आरोप करतो. त्या आरोपांना माझ्या दृष्टीकोनातून महत्त्व द्यावे असे वाटत नाही. त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याची देखील मला गरज वाटत नाही'', अशी टीका अजित पवारांनी केली आहे.याशिवाय बारामती आणि वेल्ह्यात पैसे वाटल्याचा आरोप फेटाळत अजित पवार म्हणाले, ''हे काम निवडणूक आयोगाचे आहे. मी सात विधानसभा लोकसभा निवडणुका लढवल्या आहेत. आजपर्यंत असे मी कधी केले नाही आणि करणार नाही. कारण नसताना विरोधकांमधील काही बागलबच्चे असे धांदत आरोप करत आहे. मी त्याला महत्त्व देत नाही'', असे हल्ला त्यांनी रोहित पवारांवर चढवला आहे.दरम्यान, अजित पवार त्यांच्या आईचे हात हातात घेऊन मतदान केंद्रावर आले. यावेळी अजित पवार म्हणाले, ''विरोधक माझी आईसुद्धा माझ्यासोबत नाही, अशी अफवा पसरवत आहेत. परंतु माझ्या मातोश्री माझ्यासोबतच आहेत. त्या पुण्यात आमच्या नातेवाईकांचे लग्न होते. त्यासाठी गेल्या होत्या. त्यांनीच मला मतदानासाठी येण्याचे सांगितले. आता त्या मतदानासाठी माझ्या सोबत आल्या आहेत. आईचा मला आशीर्वाद आहे, पाठिंबा आहे. कारण शेवटी ती माझी आई आहे'', असे अजित पवार यांनी म्हटले.उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या कुटुंबीयासह काटेवाडीतील मतदान केंद्रावर झाले. अजित पवार यांच्यासोबत त्यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी देखील मतदानाचा हक्क बजावला आहे. ही निवडणूक भावकीची नसून विकासाची आहे, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

## रिक्षा चालवणारा शिंदे आमच्या समोर कोपऱ्यात बसायचा–खैरे

**छत्रपती संभाजीनगर–**मतदानाला सात दिवस राहिले असताना सत्ताधारी विरुद्ध विरोधक असे सामने रंगू लागले आहेत. उद्धवसेनेचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी खुलताबाद येथील जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'रिक्षावाला' म्हणून खिल्ली उडवली, तर शिंदेसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी खैरेंना निवडणुकीत याची किंमत चुकवावी लागेल, अशी प्रतिक्रिया दिली.रिक्षा चालवणारा हा शिंदे आमच्यानंतर शिवसेनेत आला. कोपऱ्यात बसायचा. दिघे साहेब गेल्यावर नमस्कार करत, झुकत साहेबांच्या पुढे पुढे करू लागला.उद्धवसाहेब मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी आपल्याकडे काही ठेवले नाही. समृद्धी महामार्गाचे खाते शिंदेंना दिले. त्यांनी स्वत:चीच समृद्धी साधली. सामान्यांसाठी एफएसआय वाढवून दिला. याने त्यातून लुबाडले आणि लुटलेल्या त्या पैशातून पक्ष फोडला.भाजपने मराठवाड्यासाठी काहीही केले नाही. कन्नड घाटाच्या भुयारी मार्गासाठी मी एक लाख सह्या गोळा केल्या. गडकरी सोडून भाजपच्या एकाही मंत्र्याने मदत केली नाही आणि आता मराठवाड्यात घुसत आहेत, प्रचारासाठी येत आहेत. उद्धव साहेबांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला मदत केली.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात अशाच सामान्य माणसांना मोठे केले. एका शिवसैनिकाबद्दल असे बोलणे याची खैरेंना याच निवडणुकीत किंमत चुकवावी लागेल.पैसे कुठे गेले ते खैरेंना माहीत नाही, पण उद्धव ठाकरेंना नक्कीच माहीत आहे. खैरेंनी मातोश्रीवर जाऊन हा प्रश्न विचारावा. त्या वेळी त्यांना कळेल नेमकी कुणाची समृद्धी झाली.खैरे काँग्रेसची भाषा बोलू लागले आहेत. कुणी कुणाला मदत केली हे जनता जाणते. भाजपने काय केले आणि मोदींनी काय केले हे यांनी सांगण्याची गरज नाही. लोकांना माहीत आहे, कोरोनाकाळात कोण घरात बसलं होतं आणि कोण लोकांसाठी झटत होतं. मुख्यमंत्र्यांबद्दल असे बोलणे खैरेंना शोभत नाही.


## रोहित पवारांचे वक्तव्य नैराश्यातून त्यांच्यावर निवडणूक आयोगाने विशेष लक्ष्य ठेवावे – रुपाली चाकणकर

**पुणे–**आमदार रोहित पवार मागील दीड महिना वेगवेगळी विधाने करताना त्यांच्यात नैराश्य दिसून येते. जनाधार नाकारला गेल्याने आपला विजय होणार नाही हे त्यांच्या लक्षात आल्याने ते विविध टीका करून जनतेत संभ्रम निर्माण करतात. त्यामुळे निवडणूक आयोगाने आमदार रोहित पवार यांच्यावर विशेष लक्ष्य ठेवावे अशी माझी आयोगास विनंती आहे असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.पुणे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबर बँक्वेट, वारजे येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यानंतर त्या बोलत होत्या. पुणे लोकसभेचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ ही बैठक महत्वपूर्ण होती. पुण्यातील मतदारांशी संवाद साधत जनसंपर्क वाढवत जास्तीत जास्त मतदान करण्यासाठक्ष प्रयत्न करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले. त्यासोबत संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित करत नरेंद्र मोदी व महायुती सरकारच्या योजना तळागळातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यरत रहाण्याच्या सूचना देखील यावेळी देण्यात आल्या. निवडणुक शेवटच्या टप्प्यात आली आहे. बारामती निवडणुक वेळी पाहिले गेले की, अनेक मतदारांना मतदान करावयाचे होते परंतु त्यांची नावे मतदार यादीतून वगळलेली होती.

## काँग्रेस नेते दहशतवादी कसाबची बाजू मांडत आहेत:वडेट्टीवारांच्या २६/११ विषयीच्या वक्तव्यावरुन नरेंद्र मोदींनी काँग्रेसला घेरले

**अहमदनगर–**काँग्रेसची बी टीम क्टिव्ह झाली असून सीमेच्या पलीकडून ट्विट केले जात असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. त्या बदल्यात काँग्रेसचे नेते पाकिस्तानला दहशतवादी हल्ल्यातून क्लीन चीट देण्याचे काम करत आहेत. मुंबईमध्ये झालेला २६/११ चा हल्ला पाकिस्तान ने केलेला हल्ला होता. आपल्या जवानांना दहशतवाद्यांनी शहीद केले होते. आपल्या निर्दोष नागरिकांची हत्या दहशतवाद्यांनी केली होती. हे सर्व जगाला माहिती आहे. न्यायालयाने देखील या विषयावर निर्णय दिला आहे. इतकच नाही तर पाकिस्तानने देखील दहशतवादी हल्ला झाल्याचे मान्य केले आहे. या दहशतवाद्यांचे फोन रेकॉर्ड उपलब्ध आहेत. असे असताना काँग्रेस पक्षाचे नेते आता दहशतवाद्यांना निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र जाहीर करत आहेत. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्या संदर्भात काँग्रेसच्या नेत्यांचे वक्तव्य अतिशय धोकादायक असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे . आता काँग्रेस पक्षातील नेते आतंकी कसाबची बाजू मांडत असल्याचे मोदी यांनी म्हटले आहे.

श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांनी दिला त्या साईबाबांच्या चरणी नतमस्तक होतो. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनाही कोटी कोटी अभिवादन करतो. असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदनगर जिल्ह्यातील प्रचार सभेला मराठीतून सुरुवात केली. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार सदाशिवराव लोखंडे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी ते बोलत होते. हा मुंबई हल्ल्यातील सर्व निर्दोष नागरिकांचा अपमान आहे. हा मुंबई हल्ल्यात सर्व दहशतवाद्यांना मारणाऱ्या सुरक्षा दलाचा हा अपमान आहे. शहीद तुकाराम वांजळे सारख्या सर्व शहिदांचा हा अपमान असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. काँग्रेस देशाला कोणत्या बाजूला घेऊन जात आहे? असा प्रश्न देखील नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केला. तुष्टीकरण करण्याच्या नादात काँग्रेस आपली पातळी खाली आणत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे. अशा काँग्रेसला महाराष्ट्रात एक देखील जागा मिळायला नको, असे देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.काँग्रेस आणि त्यांचे सहकारी खतरनाक खेळ खेळत असल्याचे मी अनेक दिवसापासून



सांगत होतो. आता इंडिया आघाडीच्या एका मोठ्या नेत्याने या खतरनाक खेळावरुन पडदा काढला आहे. जो नेता आताच तुरुंगातून बाहेर आला आहे. तो नेता म्हणजे लालूप्रसाद यादव असून त्यांनी देशात इंडिया आघाडीचे सरकार आले मुस्लिमांना आरक्षण देणार असल्याचे जाहीर केले असल्याचे मोदींनी म्हटले आहे. इतकेच नाही तर ते मुस्लिमांना पूर्ण आरक्षण देणार असल्याचा दावा लालूप्रसाद यादव यांनी केला असल्याचे मोदी म्हणाले.वास्तविक देशात एससी, एनटी, ओबीसी या समाजाकडे पूर्ण आरक्षण आहे. त्यामुळे आता इंडिया आघाडी हे पूर्ण आरक्षण काढून मुसलमान समाजाला देणार असल्याचे सांगत आहे, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. या माध्यमातून केवळ स्वत:च्या मतदारांना खुश करण्याचे काम इंडिया आघाडी करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला. जे काम करण्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थांबवले होते तेच काम त्यांना करायचे असल्याचे मोदी यांनी म्हटले आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास संविधानाने मनाई केली आहे. तरी देखील ते संविधान बदलायचे असल्यामुळेच अशा पद्धतीने आरक्षण देण्याची भाषा काँग्रेस करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.निवडणुकीच्या पूर्वी जो भानुमतीचा कुणबा एकत्र आला होता. हा कुणबा ४ जून नंतर वाळूच्या किल्ल्याप्रमाणे संपणार असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. यावेळेस निवडणूक ही संतुष्टीकरण आणि तृष्टीकरण यांच्या दरम्यान होत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. एनडीए मेहनतीच्या माध्यमातून संतुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे इंडि आघाडीचे नेते तृष्टीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.काँग्रेस पक्षाने जाहीर केलेला जाहीरनामा हा पूर्णपणे मुस्लिम लीगचा जाहीरनामा असल्याचा दावा पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. भारतीय जनता पक्ष आणि एनडीएतील घटक पक्षातील जाहीरनाम्यात कोणते मुद्दे देण्यात आले आहेत, हे पहा. विकास, गरीब कल्याण, राष्ट्रीय सुरक्षा, देशाचा स्वाभिमान, देशाचा सन्मान हे सर्व एनडीएच्या जाहीरनाम्यातील मुद्दे असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. यातील एकाही मुद्द्यावर काँग्रेस बोलत नसल्याचा आरोप नरेंद्र मोदी केला आहे.काँग्रेसने ५० वर्ष गरिबी हटवण्याचे खोटे आश्वासन दिले होते. गरिबांसोबत काँग्रेसने सर्वात मोठा विश्वासघात केला असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्याला विरोध केला होता. त्या जाती आधारीत आरक्षण देण्याची भाषा काँग्रेस करत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

## श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान येथे, निळकंठेश्वर शिवलिंगाची भव्य प्राणप्रतिष्ठा संपन्न

# विठ्ठल महाराज शास्त्री हे ऊसतोड कामगाराच्या पोटी जन्माला आलेल रत्न-ह.भ.प.आईसाहेब राधाताई सानप

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील बालघाट डोंगररांगेच्या कुशीत उध्व कुंडलीका मध्यम प्रकल्पाच्या काठावर आणि ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वेदांतनगर या ठिकाणी सन-२०१८ मध्ये ह.भ.प.आचार्य श्री.विठ्ठल महाराज शास्त्रींनी श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थानची स्थापना केली.

अत्यंत दुर्लक्षित असलेल्या डोंगराळ,दुर्गम आणि खडतर परिसरामध्ये त्यांचा हा विश्व मांगल्याचा प्रवास सोपा नसताना अनेक संकटावर मात करून तो व्यवस्थित पुढे चालू ठेवला आहे त्याचाच एक प्रत्यय म्हणून या वर्षी संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर संस्थान येथे,संकल्पकपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर शिवलिंगाचे भव्य प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्ताने त्रिदिनी कीर्तन महोत्सव संपन्न झाले.

ह.भ.प.आचार्य श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून श्री क्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांत नगर येथे,मागील पाच वर्षापासून लोक उपयोगी अनेक दिव्य सामाजिक आणि धार्मिक उपक्रमाच्या आयोजन करण्यात आलेले आहे त्यामध्ये बाल सुसंस्कार शिबीर, आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर वृक्षरोपण,अन्नदान,वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून विविध व्याख्याने आणि कीर्तन महोत्सव यशस्वीपणे त्यांनी पारपाडलेले आहेत.

संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्ताने आयोजित केलेले दिव्य शिवलिलामृत पारायण सोहळा आणि त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचा चैत्र वद्य एकादशीस शनिवार दि.०४ मे २०२४ रोजी शुभ मुहूर्तावर प्रारंभ झाला पहिल्याच दिवशी महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार असणाऱ्या ह.भ.प.तपश्विनी महंत राधाताई महाराज सानप (आईसाहेब)यांचे सुश्राव्य कीर्तन झाले व त्यांनी ह.भ.प.आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री यांना अल्पवयात,अल्प वेळेत निळकंठेश्वर संस्थानाची फार मोठी प्रगती केली आहे उत्तर उत्तर प्रगती घडत राहो ऐश्वर्या संपन्न भगवान बाबांचा आपल्याला आशीर्वाद आहे असा आशीर्वाद त्यांनी दिला रविवार दि.०५ एप्रिल २०२४ रोजी भगवान श्री



निळकंठेश्वराचे हे शिवलिंग आणि नंदी ४०० किलो वजनाचे असून ते मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथील नर्मदा नदी पात्रातील आहे हे शिवलिंग नर्मदा मैय्यातील असून अल्प भक्तीने संतोषीत होऊन भक्तांच्या मनोकामना व संकल्पपुर्ती पूर्ण होते अशी शिवभक्तांची श्रद्धा आहे मराठवाड्यातील ओजस्वी आणि तेजस्वी महानतांच्या शुभ हस्ते ही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली त्यामध्ये स्वामी श्री.भारतानंदजी गिरी,डॉ.ह.भ.प.नामदेव शास्त्री भगवानगड,ह.भ.प.प्रेममुर्ती आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड,ह.भ.प.शांती ब्रह्मचारी महंत नवनाथ महाराज गोरक्षनाथ टेकडी,ह.भ.प. गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंनडे बंकट स्वामी,गुरुवर्य एकनाथ महाराज स्वामीजी,ह.भ.प. तपोनिधी महादेव महाराज चाकरवाडीकर,ह.भ.प.लक्ष्मीताई वडवणी आदींच्या शुभ हस्ते शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा झाली तर पुरोहित यज्ञाचार्य वे.मू.अक्षयशास्त्री रत्नपारखी श्रीराम मंदिर अयोध्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे विशेष मानकरी असणारे यांच्या मंत्र उच्चारणे श्री निळकंठेश्वराची शिवलिंगाचे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली या यज्ञच्या पूजेसाठी शेकडो स्त्री पुरुषाच्या जोड्या बसल्या होत्या तर सायंकाळी ह.भ.प.वेदांताचार्य महंत श्री. विवेकानंद महाराज शास्त्री सिद्धेश्वर संस्थान श्रीक्षेत्र शिरूर का. यांचे सुश्राव्य कीर्तन रुपी सेवा पारपडली तसेच ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या वाढदिवसाच्या दिवशी अर्थात चैत्र वद्य त्रयोदशी सोमवार दि.६ एप्रिल २०२४ रोजी ह.भ.प.भागवताचार्य केशव महाराज उखळीकर यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तनाने या महोत्सवाची सांगता झाली.

संकल्प पूर्ती भगवान श्री निळकंठेश्वर प्राणप्रतिष्ठा व भव्य त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला तसेच या संपूर्ण महोत्सवाचे महिमा कीर्तनाचा या यूट्यूब चॅनल वर लाईव्ह प्रक्षेपण केल्यामुळे लाखो भाविक भक्तांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचवला.

अत्यंत दुर्लक्षित असलेल्या भागाचे आज निसर्गाच्या सानिध्यात नंदनवन केले आहे प्राचीन काळाची गुरुकुल व्यवस्थेची आठवण या ठिकाणी आल्यावर आल्याशिवाय राहत नाही पश्चिम महाराष्ट्राची अनुभूती या ठिकाणी येते कोणत्याही प्रकारचा शासनाची अनुदान नसताना हे संस्थान महाराजांनी उभे केले आहे या ठिकाणी झालेल्या महोत्सवाची संपूर्ण वडवणी तालुक्यामध्ये चर्चा होत आहे.

# कौसडी परिसरात जिओच्या नेटवर्कमुळे ग्राहक वैतागले

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी व परिसरात मागील अनेक दिवसापासून जिओ सिम कार्ड वापरणारे ग्राहक जिओ नेटवर्कला त्रस्त झाले आहे.

जिओ टॉवरला नेटवर्क फुल असतो मात्र ग्राहकांनी फोनवर संपर्क केले तर आवाज येत नसल्याचा प्रकार घडत आहे. यामुळे जिओ कंपनीचे सिम कार्ड वापरणाऱ्या ग्राहकांमध्ये रोष व्यक्त केला जात. कौसडी व परिसरातील इतर नेटवर्कच्या ग्राहकांनी काही दिवसापूर्वी जिओ टॉवरच्या कंपनीकडून विविध योजना देत असल्यामुळे आपले कार्ड पोर्ट करून जिओ नेटवर्क मध्ये बदलून घेतले परंतु जिओ नेटवर्कचे टॉवर अनेक वेळा कोणत्या ना कोणत्या कारणाने बंद पडत आहे. यामुळे जिओ सिम कार्ड वापरणाऱ्या ग्राहकांचा संपर्क बंद होत आहे तर कधी नेटवर्क फुल असतो परंतु आवाजच येत नाही. इंटरनेट सुविधाही खंडित होत आहे.

बदलत्या काळानुसार मोबाईल यंत्र जीवनातील अविभाजक घटक ठरले आहे. त्यामुळे त्यात मानवी सोयी सुविधा एका क्लिकवर मिळत आहे. परंतु त्याचा आर्थिक फटका मोबाईल धारकांना बसत आहे. जिओ ग्राहकांनी शेकडो रुपयांचे केलेले रिचार्ज नेटवर्क नसल्यामुळे वाया जात आहेत तर कधी नेटवर्क असलं तरी संपर्क होत नाही तसेच इंटरनेट सुविधाही बंद पडत आहे.

जिओ नेटवर्कची सुविधा व्यवस्थित मिळत नसल्याने ग्राहकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. जिओ कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन जिओ ग्राहकांना होणारी अडचण दूर करावी अशी मागणी अशी मागणी कौसडी व परिसरातील जिओ ग्राहकांकडून होता आहे.



# कु.युक्ता रंजलकर हिचे दहावी आयसीएसई परीक्षेत उत्तुंग यश!

**नांदेड । प्रतिनिधी**

ठाणे येथील हिरानंदानी फाउंडेशन आयसीएसई स्कूलची



विद्यार्थिनी कु. युक्ता पांडुरंगराव रंजलकर हिने आयसीएसई दहावी परीक्षेमध्ये ९६.८३% गुण मिळवून उत्तुंग यश मिळविले आहे. तिने लिहिलेल्या ' दि मिल्की वे ' या अंतराळ क्षेत्रातील विज्ञानरहस्यमय कथासंग्रहाचे प्रकाशन नांदेड शहरांमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दोन वर्षांपूर्वी करण्यात आले होते. नांदेडच्या प्रतिभानिकेतन शाळेतील जुन्या पिढीतील इंग्रजी विषयाचे नामवंत, तज्ञ, विद्यार्थीप्रिय शिक्षक स्व. गजाननराव नेरलकर, श्रीमती प्रभावती नेरलकर यांची ती नात असून व नांदेड येथील युवा उद्योजक हृषिकेश नेरलकर, शिवसेनेच्या नेत्या सौ. अपर्णा नेरलकर यांची भाच्ची आहे. तिचे वडील पांडुरंग रंजलकर व आई सौ. वृषाली नेरलकर- रंजलकर हे दोघेही संगणक अभियंते असून आई मुंबई येथील असेंचर या आंतरराष्ट्रीय संगणक सॉफ्टवेअर कंपनीमध्ये वरिष्ठ संगणकतज्ञ व वडील ओरॅकल या सॉफ्टवेअर कंपनीमध्ये कार्यरत आहेत. तिच्या या यशाबद्दल रंजलकर ,नेरलकर परिवारातर्फे व नांदेड मधील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.

# ध्यान हे मनाला निरोगी बनविण्यासाठीचे प्रभावी माध्यम-प्रा.विनय सोनुळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन व आई सेंटर प्रो तर्फे आयोजित दोन दिवसीय शिबिरास अंबाजोगाईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजच्या या धकाधकीच्या व ताणतणावपूर्ण जीवनात, दैनंदिन कामकाजात सर्वच जण इतके मग्न झाले आहेत. की, त्यांना स्वतःच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळच नाही. काही जण शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायाम करतात पण, आपले मन निरोगी राखण्यासाठी काय करावे हे बहुतांशी जणांना माहिती नसल्यामुळे किंवा कळतय पण वळत नाही या उक्तीप्रमाणे मानव हा दैनंदिन जीवनात नैराश्य, उदासीनता, अपयश, उद्विग्नता, व्यसनाधीनता व ताण-तणावास सामोरे जावे लागत आहे. यावर उपाय म्हणजेच नियमित ध्यान करणे आवश्यक असून केवळ ध्यान हे मनाला निरोगी बनवण्यासाठी चे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशनचे केंद्रीय समन्वयक तथा मानसशास्त्रज्ज्ञ प्रा. विनय सोनुळे यांनी केले.

येथील प्रशिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेले विद्यार्थी-पालक, तसेच नोकरदार व व्यावसायिकांसाठी स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकासाबरोबरच, करिअर गाईडन्स, नोकरी विषयक मेळावे तथा व्यवसाय मार्गदर्शन शिबिरांचे सुनियोजन करणारे व समाजभानातून सर्वांना यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली देणारे विश्वविक्रमवीर प्रशिक्षक तथा सुप्रसिद्ध लेखक नागेश जोंधळे संचालक, आई सेंटर प्रो, आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व इंग्लिश विंग्ज प्रि-प्रायमरी स्कूल यांच्या पुढाकाराने सुन्यती रिट्रीट म्हणजेच सुन्याती समता विपष्यना शिबिर - मराठवाडा चाप्टर-१ मनोहर अंबानगरीत आयोजित करण्यात आले होते. पुढे बोलताना प्रा.विनय सोनुळे यांनी या दोन दिवसीय शिबिरात सुन्य मेडिटेशन काय आहे व ते कसे करायचे त्याचबरोबर त्याचे फायदे दैनंदिन जीवनात कसे अनुभवता येता येतील यासाठीचे सखोल मार्गदर्शन विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून या शिबिरात सहभागी झालेल्या लहानांपासून मोठ्यापर्यंत जगातील सर्वांत कठीण काम व ते ही अगदी सोप्या पद्धतीने कसे करायचे याचे प्रशिक्षण प्रा.सोनुळे यांनी अतिशय प्रभावीपणे दिले. या शिबिरात मनाचे डॉक्टर म्हणून सुपरिचित असलेले सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनीही सर्वांसोबत पूर्ण वेळ सहभागी होत सुन्य ध्यानाचे नवीन कौशल्य हस्तगत केले. आपल्या मनोगतात उपस्थितांना संबोधित करताना डॉ.इंगोले यांनी शरीर जसे आजारी पडते तसेच मनही आजारी पडत असते. त्यामुळे मनाच्या आरोग्याची ही काळजी घेणे आजच्या जीवनशैलीत अत्यावश्यक आहे.

विविध प्रकारचे मानसिक आजार जसे अस्वस्थता, ओसी डी, व्यसनाधीनता यामध्ये या सुन्यती मेडिटेशन



तंत्राचा वापर करून या आजारांवर मानसिक नियंत्रण मिळण्यास मदत होईल असे प्रतिपादन डॉ.इंगोले यांनी केले. सुन्यती समता मेडिटेशन मध्ये श्वासाचा उपयोग करून मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. याद्वारे मनावर संस्कार घडवून मन योग्य रितीने नियंत्रणात आणण्यासाठी मदत होते. आपल्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रॅक्टिसच्या स्वानुभावातून ध्यान हे अतिशय अमूल्य अशी देणगी असून मानवी कल्याणासाठी त्याचा सदुपयोग होणे व तो आपण करून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले तसेच सर्वांना ध्यान साधना करण्यासाठी लवकरच सुसज्ज असा हॉल लवकरच अंबाजोगाईकरांच्या सेवेत उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. प्राचार्या सुवर्णा कुलकर्णी यांनी मनोगतात आपल्या शैक्षणिक संस्था चालवत असताना वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात प्रचंड ताण-तणावास त्यांना सामोरे जाऊन आपली जबाबदारी पार पाडणे तारेवरची कसरत असल्यामुळे या शून्य समता विपश्यना शिबिराचा खूप फायदा असुन नियमित त्याचा सराव करण्याचा निर्धार सर्वांसमोर केला. योगगुरू अरूण शिंदे यांनी मी याआधीही ध्यानसाधना केली आहे. परंतु, सुन्यती मेडिटेशन आजवर केलेल्या सर्व ध्यानसाधनेत सहज सोपे व प्रभावशाली वाटले असे मत व्यक्त केले. या शिबिरात मराठवाड्यातील विविध भागातून आलेले तरूण-तरूणींनी तसेच सजग महिला व पुरूष यामध्ये डॉक्टर, इंजिनीअर, ॲडव्होकेट, पोलीस अधिकारी, शिक्षक - प्राध्यापक, संस्थाचालक, व्यावसायिक व विद्यार्थी अशी विविध क्षेत्रातील मान्यवर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी सुन्यती इंटरनॅशनल फाऊंडेशनचे करण जगदंबे व नरेंद्र बोरकर यांच्या समवेत आई सेंटर प्रो चे कॉर्पोरेट मॅनेजर संदीप अंबेसंगे, अल्पा पांडे, प्राचार्या सुवर्णा कुलकर्णी, तरूण उद्योजक सचिन थोरात, अरूण शिंदे, अविनाश निर्मळ, समीर सय्यद, प्रतीक गौतम व सर्व फॅमिली मेंबर्स यांनी स्वयंस्फुर्तीने परिश्रम घेतले. शेवटी सुन्यती इंटरनॅशनल फाऊंडेशन व आई सेंटर प्रो तर्फे सर्व सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना ध्यानाचे रेड बेल्ट, ऑरेंज बेल्ट, येलो बेल्ट व ग्रीन बेल्ट असे चार लेवल चे प्रमाणपत्र व सुप्रसिद्ध लेखक नागेश जोंधळे लिखित द डायनामिक सिरीजचे द बेसिक स्पोकन इंग्लिश कोर्स हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर प्रत्येक भारतीयांना लाखो वाक्य बोलण्यासाठी व लिहिण्यासाठी शिकविणारे पुस्तक देण्यात आले व शिबिरामध्ये सहभागी झालेले सर्व मान्यवरांचे ऋण व्यक्त करीत कार्यक्रमाची सांगता झाली.

## वंचितच्या शिर्डी लोकसभेच्या महिला उमेदवार

# उत्कर्षा रूपवते यांच्या कारवर राजूर येथे दगडफेक व हल्ला

**संगमनेर । प्रतिनिधी**

शिर्डी लोकसभेच्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रूपवते यांनी आज पत्रकार परिषद घेऊन त्यांच्यावर काल रात्री झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवला आणि राजकीय विरोधकांचा समाचार घेतला. उत्कर्षा रूपवते या काल रात्री कार्यकर्ते व सहकाऱ्यांसमवेत अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील प्रचार दौरा आटपून संगमनेरला परतत असताना काही हल्लेखोरांनी त्यांच्या चारचाकी वाहनावर दगडफेक करत हल्ला केला होता.त्यात त्यांच्या कारची काच फुटली असून त्या थोडक्यात बचावल्या आहेत.निवडणूकीत विरोधकांना त्यांची हार स्पष्ट दिसत आहे म्हणून घाबरलेल्या प्रस्थापितांनी रडीचा डाव खेळायला सुरुवात केली आहे. काल रात्री माझ्यावर झालेला हल्ला हा त्याचाच भाग होता. पण हा अत्यंत केविलवाणा प्रयत्न आहे, असे त्या आज पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाल्या.स्वातंत्र्यानंतर शिर्डी लोकसभा निवडणूकीत पहिल्यांदाच एक महिला उमेदवार निवडणूक लढत आहे.गेल्या २० वर्षात मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय आहे, परंतु कधीही मला असा अनुभव आला नाही. पण आज शिर्डी लोकसभा निवडणूकीत एक सक्षम उमेदवार म्हणून माझे आव्हान उभे राहिले असल्याने माझ्यावर भ्याड हल्ला केला



गेला आहे. हल्ला करणारे माझे विरोधकच आहेत हे सर्वांना माहिती आहे.विरोधकांनी लक्षात ठेवावे,मी राजमाता जिजाऊ, सावित्रीमाई फुले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेक असून निवडणुकीचे मैदान काही सोडून जाणार नाही.इतर पक्षांप्रमाणे वंचित बहुजन आघाडी हा धनदांडग्यांचा पक्ष नाही. पण माझ्यामागे वांचितचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी खंबीरपणे उभे आहेत. जनता माझ्यासोबत उभी आहे. या हल्ल्यामुळे माझा निर्धार दुपटीने वाढला आहे. आम्ही सर्वजण निवडणूक दुप्पट ताकदीने लढवू आणि जिंकून येऊ, असा विश्वास यावेळी उत्कर्षा रूपवते यांनी व्यक्त केला.दरम्यान उत्कर्षा रूपवते या शिर्डी लोकसभेच्या वंचीत बहुजन आघाडीच्या उमेदवार असून महायुतीचे सदाशिव लोखंडे आणि महाविकास आघाडीचे भाऊसाहेब वाकचौरे यांच्याविरोधात लढत आहेत.उत्कर्षा रूपवते यांच्यावर लोकसभा निवडणुक प्रचारादरम्यान झालेल्या हल्ल्यामागे राजकीय कारण असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.एका महिला उमेदवारावर झालेल्या या भ्याड हल्ल्याचा समाजमाध्यमे आणि ठिकठिकाणहून निषेध व्यक्त केला जात आहे.

# मानवत येथील नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी २००२ च्या मित्र परिवारांचा स्नेह - मिलन सोहळा संपन्न




**मानवत । प्रतिनिधी**

मानवत येथील वैभवशाली इतिहास असलेल्या नेताजी सुभाष शिक्षण संस्थेच्या नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी २००२ च्या बॅचचा स्नेहमीलन सोहळा अतिशय दिमाखातमानवत येथील रेणुका मंगल कार्यालय या ठिकाणी अतिशय दिमाखात दोन दिवसीय सत्रात साजरा झाला. यावेळी कार्यक्रमासाठी एकूण १०२ मुले व मुली उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमा निमित्त गुरु पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक आ. श्री. गोपिकिशनजी सिखवाल सर, आ. श्री, रामेश्वरजी भराडिया सर, आ. श्री .दत्तात्रेय नेवरेकर सर,आ. श्री. शिवराज येलमटे सर,आ. श्री. प्रकाशजी काकडे सर, आ. श्री केशवरावजी शिंदे सर, आ. श्री. मानसिंगजी मोरे सर,आ. श्री, प्रल्हादबूवा पुरी सर, श्री. विनायकराव कुलकर्णी सर, श्री अशोकराव काळे सर, श्री गोविंदजी सीखवाल सर, श्री. उत्तमराव थोंबाळ सर, श्री रामेश्वरजी मुंदडा सर, श्री. ऊध्दवरावजी हारकाळ स आदीसह अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांचा अल्पपरिचय व सर्व शिक्षकांचा गुरु पूजनाचा कार्यक्रम अतिशय दिमाखात साजरा झाला या स्नेह मिलनासाठी सर्व संयोजन समितीने यशस्वीपणे कामकाज पार पाडले या वेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती पूनमताई वट्मवार , शशिकांतजी नेवरेकर, विष्णूभाऊ लाड यांनी केले. तर सर्वमान्यवरांचे शब्दसुमनानी स्वागत श्रीमती स्नेहाताई प्रितम लकडे हिने केले. या वेळी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. निरजसा दगडू , डॉ. माधवीताई कोकरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# गोंडपिपरीतील तलावात बुडालेल्या दोन्ही मुलांचे मृतदेह सापडले

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

गोंडपिपरी येथील न्यायालयाच्या मागे तलावात मित्रांसोबत अंघोळीला गेलेल्या दोन चिमुकल्यांचा तलावात बुडाल्याची घटना दि(७) मंगळवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास घडली .सदर घटना ही मंगळवारी रात्री आठ वाजता दरम्यान उघडकीस आली .माहिती मिळताच गावकरी आणि ठाणेदार रमेश हत्तिगोटे यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बुडालेल्या बालकांची शोधमोहीम हाती घेतली होती.मात्र रात्र झाल्याने मृतदेह सापडू शकले नाही बुधवारी दोन्ही बालकांचे मृतदेह सापडले.



गौरव विलास ठाकूर वय १४ वर्ष ,शौर्य भास्कर पिंपळशेंडे वय १५ वर्ष रा.दोघेही गोंडपिंपरी शिवाजी चौक अशी तलावात बुडालेल्या मुलांची नावे आहेत उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या असल्याने व उन्हाचा पारा जास्त असल्याने मंगळवारी सकाळी बारा वाजता दरम्यान वार्डातीलच ११ मुले फिरायसाठी गेल्यानंतर त्यांना तलावात पोहण्याचां मोह आवरला नाही.चिमुकले पोहण्यासाठी तलावात उतरले पाण्यात व्हाॅलिबॉल खेडत होते. तेथील ९ मुले घरी परतले तर दोघे बुडाले.मात्र भीतीपोटी ईतर ९ चिमुकल्यांनी ही घटना घरच्यांना सांगितली नाही.बेपत्ता मुलांच्या घरच्यांनी शोधाशोध केली असता माहिती काढली असता पोहायला गेलेले समजले.कुटुंबीयांनी पोलिसांना सोबतीला घेत तलावाकडे रात्री ८ वाजता दरम्यान धाव घेतली.तलावाच्या बाहेर कपडे आढळले कपड्यांची ओडख पटल्याने एकच खळबळ उडाली होती.ठाणेदार हत्तिगोटे यांनी मृतदेह शोधण्यासाठी मच्छिमारांचे सहकार्य घेतले पाण्याची पातळी खोल असल्याने मृतदेह सापडले नाही.मात्र बुधवारी सकाळी ६ वाजता दोन्ही चिमुकल्यांचे मृतदेह पाण्यावर तरंगत वर आली. मृतदेह तलावाबाहेर काढून उत्तरीय तपासणीनंतर कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेमुळे गोंडपिपरीत शोककडा पसरली आहे.घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक रिना जनबंधू व पोलीस उपविभागीय अधिकारी शिवलाल भगत यांनी घटास्थळी भेट देत संवेदना व्यक्त केल्या.वढोली येथील अंधारी नदीवर बुधवारी दुपारी १ वाजता दोन्ही मृतक चीमुकल्यांचे अंत्यसंस्कार पार पडले.चंद्रपूर आष्टी राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या दोन वर्षांपूर्वी पूर्ण झाले ते काम करत असताना महसूल विभागाने मुरूम उत्खननाची परवानगी कंपनीला तलावातून काढण्यासाठी दिली. परंतु दिलेल्या परवानगीचा गैरफायदा घेत अवैद्य मोठ्या प्रमाणात मुरमाचे उत्खनन झाले. परिणामी मोठे वीस फूट तीस फूट असे खड्डे त्या ठिकाणी पडले आणि पाण्याचा अंदाज न आल्याने चिमुकल्यांना आपला जीव गमवावा लागला.बॉल खेडताना गौरव ठाकूर खोल पाण्यात बुडाला. त्याला वाचवायला संकल तयार करून शौर्य हा त्याचा हात पकडून बाहेर काढताना त्याचाही तोल गेला व दोघेही बुडाले. आणि बाकी बचावले व भीती पोटी इतर मुलं पळ काढत थरकापत घरी येऊन कुणालाही न सांगता झोपले आणि मुलं घरी आले नाही म्हणून त्याचा शोध घेतला असता एका मुलाने सर्व सांगितलं पुढे घटना उघडकीस आली.

## संत तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेतील सामाजिकता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या विचाराचा प्रचार-प्रसार व्हावा, यादृष्टीने गोंडवाना विद्यापीठातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने विविध उपक्रम राबविले जातात. या अध्यासन केंद्राच्यावतीने संत तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेतील सामाजिकता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी दुपारी १२ वाजता, विद्यापीठ सभागृहात पार पडणार आहे.

व्याख्यान कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून कुरखेडा येथील गो. ना. मुनघाटे कला, विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर असणार आहे. तर प्रमुख अतिथी मा. प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, मा. कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अध्यासन सल्लागार समितीचे सदस्य डॉ. विद्याधर बनसोड आणि सिनेट सदस्य डॉ. दिलीप चौधरी यांची उपस्थिती असणार आहे.सदर कार्यक्रमामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्यावर आधारित विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. असे जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. हेमराज निखाडे यांनी कळविले आहे.

## स्वीप समितीच्या वतीने सेल्फी भारतीयम् जागतिक विश्वविक्रम उपक्रमाचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने मतदान कार्डासह सर्वाधिक सेल्फी फोटो काढण्याच्या 'सेल्फी भारतीयम्' हा जागतिक विश्वविक्रमाची नोंद करणाऱ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसह अन्य जागतिक सुमारे १५ जागतिक विश्वविक्रम प्रमाणित करणाऱ्या संस्थांकडे अहमदनगर जिल्हा स्वीप समितीने या उपक्रमाची नामांकने सादर केली आहेत.

जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या सूचनेनुसार अहमदनगर व शिर्डी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मतदारांनी आपले राष्ट्रीय मतदार ओळखपत्र (वोटर कार्ड) हातामध्ये धरून मोबाईलमध्ये सेल्फी फोटो काढायचा आहे. देशातल्या पहिल्या अहमदनगर स्वीप केअर असलेल्या ९००२१०९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर १४ मे २०२४ पर्यंत स्वतःच्या संपूर्ण नावासह पाठवायचा आहे. सर्व सहभागी मतदारांना सहभागाचे प्रमाणपत्र व विशेष पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.जगातील सर्वात सक्षम लोकशाही असलेल्या भारताच्या चुनाव का पर्व देश का गर्व या निवडणुकांच्या महाउत्सवात राष्ट्र उभारणीला सशक्त करण्यासाठी प्रत्येकाने हिरीरीने सहभागी व्हावे व स्वतःला व समाजाला अभिमान वाटेल असे मतदान करावे.

## अधिनस्त कर्मचाऱ्यांचे मतदान झाल्याबाबत खातरजमा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात दि.१३ रोजी मतदान होणार असून या दिवशी आपापल्या अधिनस्त कर्मचारी अधिकारी यांनी मतदान केले की नाही, याबाबत सर्व अधिकाऱ्यांनी खातरजमा करुन तसा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करावा,असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज निर्गमित केले आहे. सर्व विभागप्रमुखांना दिलेल्या या आदेशात म्हटले आहे की, दि.११ व १२ मे रोजी सुटी आहे व दि.१३ मे रोजी मतदान आहे. त्यामुळे दि. १३ रोजी अधिनस्त कर्मचारी, अधिकारी मुख्यालयी राहण्याबाबत अथवा त्यांचे ज्या ठिकाणी मतदान आहे त्याठिकाणी जाऊन मतदान करण्याबाबत निर्देशीत करावे. दि.१४ रोजी त्यांनी मतदान केले की नाही याची बोटाची शाई तपासून खातरजमा करावी व तसा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयास कळवावा

## श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पूण्यतिथी निमित्त निघालेल्या शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत

### शोभायात्रेत सहभागी भाविकांना शितपेयाचे वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या १४६ व्या पूण्यतिथी निमित्त श्री स्वामी समर्थ अक्कलकोट परिवार चंद्रपूर च्या वतीने शहरातून शोभायात्रा काढण्यात आली होती. सदर शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने कार्यालयासमोर स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी भाविकांना शितपेयाचे वाटप करण्यात आले.



यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, शिक्षक विभाग प्रमुख प्रतिक शिवणकर, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, गौरव जोरगेवार, कल्पला शिंदे, कौसर खान, सतनात सिंह मिरधा, कैलास धायगुडे आदींची उपस्थिती होती.

अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पूण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान श्री स्वामी समर्थ अक्कलकोट परिवार चंद्रपूर च्या वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. विठ्ठल मंदिर वार्ड येथील श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान येथून या शोभायात्रेला सुरवात करण्यात आली. सदर शोभायात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यालया जवळ पोहचताच यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेतील पालखीचे दर्शन घेत यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांच्या वतीने शोभायात्रेत सहभागी बांधवांना शितपेयाचे वाटप करण्यात आले.

### १४ मे पर्यंत जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी

## नागरिकांनी काळजी घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार ०७ ते १४ मे २०२४ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून विजांच्या कडकडाटासह मेघगर्जनेची शक्यता वर्तविली आहे. जिल्ह्यात एक दोन ठिकाणी विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वारा (ताशी ४०-५० किमी वेगाने) आणि गडगडाट वादळासह गारपीटाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

खबरदारीची उपाययोजना म्हणून नागरीकांनी अशी घ्यावी काळजी : संरक्षणात्मक कपडे घाला आणि घरात आश्रय घ्या. मुसळधार पाऊस आणि जोरदार वारा असताना खिडक्या आणि दरवाज्यापासून दूर रहा. रोडवे अंडरपास, ड्रेनेजचे खड्डे, सखल भाग आणि जिथे पाणी साठते अशा भागातून जाणे टाळा. खराब दृश्यमानतेमुळे मुसळधार पाऊसात वाहने चालवणे टाळा. पॉवर लाईन्स किंवा विजेच्या तारांपासून दूर रहा. फ्लॅश पूर चेतावणी किंवा विजेच्या तारांपासून दूर रहा.वादळ, मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असताना : काय करावे आणि काय करु नयेविजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात आता दातांवर उत्कृष्ट उपचार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दंत विभाग समान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने चंद्रपूर जिल्ह्यातील गोरगरीब व गरजू रुग्णांना दंत उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने फिक्स प्रकारचे दात (सिरेमिक/मेंटल) आणि वेडयावाकडया दात सरळ करणे (फिक्स प्रकारचे ऑथोडॉन्टिक उपचार) या सेवा एप्रिल २०२४ पासून सुरु करण्यात आल्या आहेत.

वरील दोन्ही उपचार पद्धती अतिशय महागडया असल्यामुळे गोरगरिब व मध्यमवर्गीय रुग्णांना खाजगी रुग्णांलयात जाऊन उपचार करणे फार अडचणीचे होत होते. म्हणून राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून दातांच्या कलरचे फिक्स प्रकारचे दात (सिरेमिक /मेंटल ) गरजू रुग्णांना उपलब्ध होण्यासाठी ही उपचार पद्धती सुरु करण्यात आली आहे. सदर सुविधा सध्या जिल्हयांतील दंत विभाग कार्यान्वित बल्लारपूर, मुल, सिंदेवाही, वरोरा येथे उपलब्ध आहे. सदर उपचार पद्धतीच्या लाभ घेण्यासाठी रुग्णांना दोन ते तीन वेळा विभागात येणे अपेक्षित राहील. सदर उपचार पद्धतीच्या सुविधेमुळे जिल्ह्यातील गोरगरीब व गरजू लोकांच्या चेहरा, सौंदर्यात, बोलण्यात, अन्न चघळण्यात आणि सर्वांगीण आरोग्य सुदृढ ठेवण्यात नक्कीच मदत होईल. तसेच किशोरवयीन मुलें-मुलींमध्ये वेडयावाकडया दातांची नेहमी तक्रार असते. अशामुळे रुग्णांना दात स्वच्छ करण्यात, बोलण्यात व दिसण्यात फार अडचणी येत असतात. सदर उपचार पद्धती खाजगी रुग्णांलयातमध्ये फार महागडी असल्याने गोरगरिब व गरजू जनतेला लाभ घेणे अडचणीचे असते. म्हणून दंतशास्त्र विभागात नव्याने रुजु झालेल्या डॉ. सुप्रिया वाघमारे (ऑथोडॉन्टिक) यांच्या तज्ज्ञ सेवेचा फायदा रुग्णांना देण्यासाठी ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. जिल्हयातील सर्व गरजू लोकांनी या सुविधांचा फायदा घ्यावा, असे आवाहन दंत शल्य चिकित्सक तथा जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. संदिप पिपरे यांनी केले आहे.चंद्रपूर ज्हियात मौखिक आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी उचलेले हे महत्वपूर्ण पाऊल असून गोरगरिब व गरजू रुग्णांना आधूनिक दंतसेवेची सहज उपलब्धता प्राप्त करता येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी म्हटले आहे. चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयात सुरू झालेली आधूनिक दंत उपचार सुविधा जिल्हयातील गोरगरिब व गरजू रुग्णांना नि:शुल्क उपलब्ध होईल, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांनी म्हटले आहे.

# महिला मतदार जनजागृती;महिलांनो! मतदानात खारीचा नव्हे सिंहाचा वाटा द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मतदार यादीत निम्मे मतदार महिला आहेत. महिलांनी मतदानात आपला खारीचा नव्हे तर सिंहाचा वाटा द्यावा. महिलांचे सर्वाधिक मतदान असलेला जिल्हा आणि महिला मतदार ह्या सुजाण नागरिक असल्याची ओळख निर्माण करण्याच्या संधीचे सोने करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.महिला मतदार जनजागृती उपक्रमाअंतर्गत आज जिल्हा नियोजन सभागृहात आज उच्चशिक्षित व स्वयंसिद्ध महिलांची बैठक बोलावण्यात आली होती. विविध सामाजिक संस्था, उच्च शिक्षित, चार्टर्ड अकाऊंटंट, डॉक्टर्स, वकिल, उद्योजक, अशा विविध क्षेत्रात सक्रिय असलेल्या महिलांना या बैठकीस बोलावण्यात आले होते. स्वीप नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, सहा, नोडल अधिकारी स्वप्निल सरदार, अंकुश पांढरे आदी अधिकारी तसेच ड. शेरखाने, आरजे अर्जना, आयएमएच्या डॉ. रेणू, डॉ. उज्ज्वला झंवर, ड. रेणूका घुले, डॉ. सुषमा शिंदे, डॉ. कांचन रोपळेकर आदी विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण विविध क्षेत्रात नाव लौकीक मिळवलेल्या महिला आहात. आपण तर मतदान करालच. मात्र आपण आपल्या संपर्कातील तसेच आपल्या माध्यमातून इतर महिलांनाही मतदानासाठी प्रेरित करावे. आपली लोकशाही जगात सर्वात मोठी लोकशाही आहे. आपण आपल्या भावी पिढ्यांसाठी त्यांच्या जगण्यासाठी पैसा, मालमत्ता यांची तरतूद करण्यासाठी झटतो. मात्र पुढच्या पिढीला लोकशाहीचे मुक्त वातावरण लाभावे यासाठी आपण काय करतो? त्यासाठीच मतदान करणे आवश्यक आहे. आपल्या एका मताने काय फरक पडेल? असा प्रश्नही काही जण उपस्थित करतात. मात्र एका मतानेच फरक पडतो. मतदानाबाबत उदासिनता ही बाब अत्यंत घातक आहे. ही उदासिनता दूर करण्याचे प्रयत्न आपल्या संपर्कातून आपण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. मतदान करुन आपण सुजाण नागरिक असल्याचे सिद्ध करण्याची संधी आली आहे. आपण महिलांनी मतदानात खारीचा नव्हे तर सिंहाचा वाटा उचलून महिला ह्या सुजाण नागरिक असल्याचे सिद्ध करावे. देशात आपल्या जिल्ह्यात महिलांचे सर्वाधिक मतदान नोंदविले जावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रास्ताविक स्वप्निल सरदार यांनी तर आभारप्रदर्शन अंकुश पांढरे यांनी तर संजीव सोनार यांनी सुत्रसंचालन केले.

# भारतातील सदाबहार क्रांतीमध्ये पशुधन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल-डॉ.के.डी.कोकाटे

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या १५ व्या विस्तार आणि निरंतर शिक्षण परिषदेच्या बैठकीत संबोधित करताना, भाकृअप, नवी दिल्लीचे माजी उपमहासंचालक डॉ. के.डी. कोकाटे म्हणाले की, पुढील कृषी क्रांती पशुधन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या नेतृत्वाखाली होईल. विस्तार व निरंतर शिक्षण परिषदेची बैठक माफसु मुख्यालयात डॉ. नितीन पाटील, कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. डॉ. एस.के. रॉय, संचालक, अटारी, झोन-८, पुणे यांनी विद्यापीठाच्या आउटरीच उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले आणि राज्यातील कृषी विज्ञान केंद्र नेटवर्कच्या माध्यमातून विस्तारित उपक्रमांना भविष्यात बळकट करण्यासाठी पूर्ण पाठिंबा आणि सहकार्याची हमी दिली.





सदर बैठकीला उपस्थित इतर मान्यवरांमध्ये डॉ. व्ही. श्रीधर, वरिष्ठ महाव्यवस्थापक (व्हीएमपी), एनडीडीबी, नागपूर, वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, नाशिक चे डॉ. नितीन ठोके, अमरावती येथील किरण महल्ले आणि रवींद्र मेटकर, नागपूर येथील डॉ. महेश भोंडगे, नांदेड येथील माजीद खान रज्जाक पठाण, भागवत देवसरकर यांचा समावेश होता. निमंत्रित सदस्यांमध्ये राजू इंगळे, प्रादेशिक अधिकारी, माविम, नागपूर आणि डॉ. राजेश जयपूरकर, प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा जि. अमरावती यांचा समावेश होता. तर संचालक शिक्षण आणि अधिष्ठाता (पशु विज्ञान), माफसु, नागपूर आणि संचालक, थठढउ डॉ. एस. व्ही. उपाध्ये, शास्त्रज्ञ आणि कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख आणि माफसु चे विस्तार शिक्षण संचालक आणि परिषदेचे सचिव डॉ. अ.उ. भिकाने उपस्थित होते.

डॉ. भिकाने यांनी विद्यापीठाच्या विस्तारित उपक्रमांचे सादरीकरण केले. घटक महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठातांनी गेल्या दोन वर्षात केलेल्या विस्तार उपक्रमांचा आढावा मांडण्यात आला आणि पुढील वर्षासाठीच्या कृती मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. डॉ. नितीन पाटील, कुलगुरू यांनी येत्या वर्षभरात विद्यापीठाच्या विस्तारित उपक्रमांना अधिक बळकट करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संचालनालय विस्तार शिक्षण विभागाचे तांत्रिक अधिकारी, डॉ. जी. व्ही. धुमे, स्वियसहाय्यक आणि वरिष्ठश्रेणी लघुलेखक प्रवीण बागडे, दृकश्राव्य तंत्रज्ञ तथा स्वागतकार श मोहन कापसे आणि शगौरी भदोरिया यांच्यासह विद्यापीठाच्या सर्व विभागातील कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग होता. सहायक प्राध्यापक व तांत्रिक अधिकारी डॉ. सरिपुत लांडगे यांनी संचालन व आभार मानले.डॉ. एस. डॉ. नितीन पाटील, कुलगुरू, माफसू, नागपूर, डॉ. अ. उ. भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. एस. डब्ल्यु. बोंडे, अधिष्ठाता मत्स्यव्यवसाय, डॉ. अनिल उलमले, वरिष्ठ शास्त्रज्ञ व कृषी विज्ञान केंद्र, सांगली-२ चे प्रमुख यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारीही या भेटीदरम्यान उपस्थित होते. डॉ.सरिपूत लांडगे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दूधबुर्डी, नागपूर यांनी कृषी विज्ञान केंद्राची प्रगती आणि नवीन कॅम्पसमध्ये निर्माण होत असलेल्या सुविधांची माहिती दिली.

प्रशिक्षित प्रगतीशील दुग्धउत्पादक सचिन चिकनकर यांच्या मार्फत ४३२० दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ, आनंद यांनी प्रायोजित केलेल्या प्रकल्पाअंतर्गत कामठी तालुक्यातील बीना येथे विद्यापीठाने स्थापन केलेल्या सूक्ष्म प्रशिक्षण केंद्राला भेट दिली. विदर्भातील दुग्धव्यवसाय आणि पशुपालनाच्या व्यवस्थापन पद्धती सुधारण्यासाठी शेतकरी ते शेतकरी शिकण्याच्या संकल्पनेला प्रोत्साहन देते.

# बालविवाह होत असल्यास त्वरीत संपर्क करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आला असून त्याबाबतचे नियम महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंधक नियम २०२२ देखील लागू करण्यात आला आहे. त्यानसार बाल विवाह आयोजित करणे हा अजामीन पात्र गुन्हा आहे.या अनुषगांने १० मे २०२४ रोजी अक्षय तृतीया या दिवशी संभावित बाल विवाहाच्या घटना थांबवण्यासाठी सर्व यंत्रणानी बालविवाह प्रतिबंधक अधिनियमतील तरतुदीनुसार बालविवाह रोखण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. ग्रामीण भागात ग्रामसेवक यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी व अंगणवाडी सेविका यांना सहाय्यक अधिकारी म्हणून तसेच शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी व पर्यवेक्षिका यांना सहाय्यक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांनी सर्व खबरदारी घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. बालविवाह होत असल्यास किंवा होण्याची शक्यता असल्यास जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चंद्रपूर अंतर्गत जिल्हा चाईल्ड लाईनचे हेल्प लाईन क्र.१०९८ ला संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले आहे. १८ वर्ष वयापेक्षा जास्त वयाच्या पुरुषाने अल्पवयीन वधुशी विवाह केल्यास त्या पुरुषाला २ वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि १ लाख रुपयापर्यत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात. जाणिवपूर्वक बालविवाह ठरविल्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडल्यास किंवा प्रोत्साहन देणा-या व्यक्तिस तसेच संबंधित वरवधु यांचे आई-वडील किंवा पालक, अन्य नातेवाईक व मित्र परिवार, धार्मिक स्थळाचे विश्वस्त, फोटोग्राफर, प्रिंटींग प्रेस, वाजंत्री, लग्न सभागृहचे व्यवस्थापक, कॅटरींग अशा सर्वांनी हा विवाह घडविण्यास प्रत्यक्षात मदत केली किंवा तो न होण्यासाठी प्रयत्न केले नाही, व जे अशा विवाहात सामील झाले, त्या सर्वांना २ वर्षांपर्यंत सक्त मजुरीची कैद आणि १ लाख रुपये पर्यत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकते. सोबतच जर ग्रामसेवकांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर सुध्दा कायद्ययान्वये कार्यवाही करण्यात येते.


# नाचणंगावात घराला आग
## आगीत अंदाजे एक लाख रुपयाचे साहित्य जळून खाक

**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणंगाव गाडगे नगरात घराला अचानक लागलेल्या आगीत धान्य घरगुती वापर साहित्य कुलर फ्रिज जळून खाक झाले .

अजय तायडे राहणार गाडगे नगर नाचणंगाव ७ मे ला कुटुंबासह घराबाहेर गेले होते सायंकाळच्या सुमारास त्यांच्या घरातून अचानक आगीचे लोट निघत असल्याचे शेजारी नागरिकांना दिसले नागरिकांनी पाण्याचा मारा करून आग विझवली परंतु आगीने घरातील साहित्याला कवेत घेतल्याने आगीत फ्रिज, कूलर ,सीसीटीव्ही कॅमेरा ,कॉम्प्युटर ,एलईडी, धान्य , ईतर साहित्य आगीत जाळून खाक झाले .

नागरिकांच्या मदतीने आग विझवण्यात आली . आगीत अंदाजे एक लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा



प्राथमिक अंदाज आहे . अजय तायडे यांनी आगीच्या घटनेची पुलगाव पोलीसात तक्रार नोंदवली आगीचे घटनास्थळी पंचनामा महसूल विभागाने केला आगीचे कारण कळू शकले नाही.

## अमन (दीप) संजयजी शुक्ला यांचे दुःखद निधन



**पुलगाव-** येथील हिंगणघाट फैल निवासी अमन (दीप) संजयजी शुक्ला (वय २२ वर्ष ) यांचे दीर्घ आजारानंतर दुःखद निधन दिनांक ८ मे रोजी सकाळी ११-३० ला झाले.टी व्ही केबल व्यवसायी संजय शुक्ला यांचा अमन मुलगा आहे. त्याच्या मागे आई, वडील, एक बहीण व बराच मोठा आप्तपरिवार आहे. अंत्ययात्रा दि.९ ला सकाळी ११ वाजता शुक्ला यांच्या निवासस्थानावरून निघेल

# इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे काम प्रशंसनीय-जिल्हाधिकारी विनय गौडा





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

इंडियन रेड क्रॉस सोसायटी,इंडियन मेडिकल असोसिएशन व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. तर प्रमुख अतिथी म्हणून शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सचिव डॉ. मंगेश गुलवाडे, आयएमए चे अध्यक्ष डॉ. संजय घाटे, सचिव डॉ. प्रवीण पंत, डॉ. बी. एच. दाभेरे,डॉ. कल्पना गुलवाडे,डॉ. राजीव देवईकर,डॉ. दुधीवार,प्राचार्य पुष्पा पोळे,अश्विनी खोब्रागडे,अँड प्रिती शहा उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सामाजिक,आरोग्य,राष्ट्रीय लसीकरण व रोग निदान शिबिराच्या माध्यमातून जनसेवेचे काम उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. तसेच नुकतेच इंडियन रेड क्रॉस सोसायटीला शासनाकडून संमत झालेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तीला देखील लाभ पोहचविण्याचे आवाहन इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या सदस्यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ. मंगेश गुलवाडे यांनी रेड क्रॉस सोसायटीच्या माध्यमातून सुरू असलेले रोगनिदान शिबिर,रक्तदान शिबिर,प्राथमिक उपचार प्रशिक्षण,साप्ताहिक ज्येष्ठ नागरिकांसाठी नि:शुल्क आरोग्य सेवा व ना नफा व ना तोटा तत्त्वावर आधारित जेनेरिक मेडिकल स्टोअर आदी विषयांवर जनजागृती कार्यक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमात डॉ. कल्पना गुलवाडे यांनी उष्माघातबद्दल घ्यावयाची काळजी व माहिती याबद्दल मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. मिलिंद कांबळे,डॉ. महादेव चिंचोळे,डॉ. संजय घाटे यांनी सुध्दा मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन धनंजय तावाडे व रागिनी सिस्टर यांनी तर आभार पियुष मेश्राम यांनी मानले. यावेळी सुभाष मुरस्कर,आरिफ भाई, रुपेश ताकसांडे,आशिष गिरडकर व परिचारिका वस्तीगृहातील कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून स्विमींग पुल व बॅडमिंटन हॉलची पाहणी





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकूल, चंद्रपूर येथे अद्यावतीकरण करण्यात येत असलेल्या स्विमींग पुल आणि बॅडमिंटन हॉलच्या बांधकामाची मंगळवारी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. आणि जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पाहणी केली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड व इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा संकुलातील अत्याधुनिक बॅडमिंटन हॉल करिता जिल्हा नियोजन समितीमधून ५ कोटी ३९ लक्ष रूपये इतका निधी प्राप्त झाला आहे. बॅडमिंटन हॉलचे बांधकाम एका महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच जलतरण तलावाकरिता नाविन्यपूर्ण योजनेमधून सन २०२२- २३ मध्ये १ कोटी ५० लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. त्या निधीतून जलतरण तलाव अद्यावतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील असंख्य जलतरणपटू सराव करण्यास आतुर आहेत. गुरुवार दिनांक ९ मे पासून स्विमींग पुल येथे उन्हाळी शिबिराची (समर कॅम्प) सुरवात होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी स्विमींग करीता नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे.

# मातंग समाजातील युवतीच्या बलात्कार व हत्या प्रकरणी आरोपीला फाशी द्यावी, मातंग समाजबांधवांची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मुंबई येथील मातंग समाजातील कु. पुनम क्षीरसागर या २६ वर्षीय युवतीवर अमानुष बलात्कार व खून करुन तिचा मृतदेह खाडीत फेकुन देणाऱ्या निजामुद्दीन शेख या नराधम आरोपीवर कठोर कारवाई करुन त्याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात यावी या मागणीचे निवेदन चंद्रपूर जिल्हा मातंग समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

दि. ०८ मे, २०२४ रोजी संघटनेच्या मार्गदर्शक, माजी नगरसेविका श्रीमती रत्नमाला बावने यांच्या नेतृत्वात संघटनेचे पदाधिकारी राजु येले, अरुणकुमार कांबळे, प्रशांत डोंगरे, साजन चहारे, राहुल पडघाने, रवि डोंगरे, सौ. रोशनी कांबळे, निखिल गायकवाड यांनी उपजिल्हाधिकारी देशपांडे यांच्या मार्फतीने




राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांना निवेदन सादर करून आरोपी व अन्य फरार आरोपींचा शोध घेवून कठोर शासन करण्याची मागणी केली.

भविष्यात अशा प्रकारच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनस्तरावरून ठोस उपाययोजना व महिला, युवतींना संरक्षण देण्याकरिता शासनाने कठोर कायदा अंमलात आणुन आरोपींवर फास्ट्रॅक कोर्टाव्दारे सुनावणी घेवून शिक्षा ठोठावण्यात यावी अशी मागणी मातंग समाज बांधवांनी या निवेदनाव्दारे केली आहे.

# तुम्ही जे पेराल ते फळ मिळेल -विरागसागरजी महाराज

**पुलगाव । प्रतिनिधी**

जैन ऋषी राष्ट्रसंत विरागसागरजी महाराज यांनी पुलगाव येथे प्रवचन देताना सांगितले की, सुख आणि दुःख या दोन्हींचा निर्माता माणूसच आहे. जगातला प्रत्येक जीव पाप आणि सत्कर्माच्या रूपाने कर्माच्या झुल्यात झुलत असतो, जो हातगाडीत बसलेला असतो तो त्याच्या पुण्यकर्माचे फळ भोगत असतो, तर दुसरा जो हातगाडी घेऊन फिरतो. आपल्या पापकर्माचे फळ भोगत असतो जैनागम भगवंताला सुख-दुःखाचा कर्ता मानत नाही, तर त्याला रागच म्हणतील. द्वेश आणि राग आणि द्वेषाने भरलेल्याला देव म्हणता येणार नाही.आपण आपल्या जीवनात बाभळीची बी पेरतो आणि



त्या बदल्यात आपल्याला आंब्याची अपेक्षा असते, त्यासाठी आपल्याला आंब्याची बीजे पेरावी लागतील आणि आपण दुःखाची बीजे पेरली तर आपल्याला फक्त दुःखच मिळेल.गुरुदेवांनी पुष्प प्रवचनात सांगितले की, सद्गुण प्राप्त करण्यासाठी आपल्याला देवाची भक्ती, उपासना, दया, दान आणि धर्माप्रती श्रद्धा यांचे बीज पेरावे लागेल.तुम्ही पेरलेल्या या बिया तुमचे जीवन निर्वाणाच्या फळाने भरून जातील आणि तुम्हाला शाश्वत आनंद मिळू शकेल, शाश्वत सुख म्हणजे संसाराचे सुख, जे प्राप्त केल्यानंतर क्षणिक सुखाच्या आकांक्षेने आपल्यावर परिणाम होणार नाही. दुःख आणि संसाराच्या सुखात तुम्ही तुमच्या जीवनातील हिंसा, दुष्कर्म, असत्य, चोरी, दुष्कर्म, आसक्ती इत्यादि पापांचा त्याग करून पुण्य कर्म साध्य करण्याच्या प्रयत्नांना जागृत करू शकाल आणि सदैव सजग राहाल. प्रवचनाच्या आधी श्रीजींचा अभिषेक, शांतीधारा, मंगलचरण, दीपप्रज्वलन, पाद पक्षाला, शास्त्रोक्त अर्पण आदी विधी पार पडले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .